पशुसल्ला

# अशी निवडा दुधाळ गाय

**प्रणिता सहाणे**
सहायक प्राध्यापक,
कृषी व्यवसाय व्यवस्थापन
महाविद्यालय,
गुंजाळवाडी पठार, संगमनेर,
जि. अहमदनगर





भरपूर मोठी कास असल्यावरच गाय जास्त दूध देते असे नाही. कास ही मोठी असावी परंतु लोंबकळणारी नसावी. कास जास्तीत जास्त शरीरास चिकटलेली असावी. गाईच्या कासेकडून पोटाकडे जाणारी दुधाची शीर ही स्पष्ट मोठी, जाड, फुगीर व नागमोडी असावी. कासेवर जास्तीत जास्त लहान नागमोडी दुधाच्या शिरा असाव्यात.

गाईंची दूध उत्पादन क्षमता ही आनुवंशिकतेवर अवलंबून असते. उत्तम गुण असलेल्या गाई निवडणे ही दुग्धोत्पादनासाठी अत्यावश्यक अशी बाब आहे. गाईंच्या वंशावळीची नोंद ठेवणे शेतकऱ्यासाठी शक्य असतेच असे नाही. या नोंदी फक्त संशोधन प्रकल्पावर ठेवल्या जातात. त्यामुळे बाजारामध्ये मिळणाऱ्या जनावरांची निवड करताना ती त्यांच्या शरीररचनेच्या सहाय्यानेच केली जाते.

दुधाळ गाईची निवड करताना खालील गोष्टी विचारात घ्याव्यात-

* दुधाळ गायीचे वय ३ ते ४ वर्षे किंवा दुसऱ्या वेताचे असावे. कारण यामुळे तिच्या अगोदरच्या वेताचे दूध उत्पादन माहिती करून घेता येते, त्याचबरोबर ती गाय अजून किती दूध देऊ शकते याचाही अंदाज येतो.

* जातिवंत दुधाळ गाई तरतरीत आणि निरोगी दिसतात. डोळे पाणीदार असावेत. सर्व अवयवांची ठेवण प्रमाणबद्ध असते. त्यांची त्वचा ही मऊ, चमकदार, कमी व आखूड केस असणारी असावी. अंगावर जास्त चरबी नसावी. नाकपुड्या रुंद असाव्यात, छाती रूंद असावी, खुरे वाढलेली नसावी.

* आपल्याच भागातल्या किंवा ओळखीच्या गोठ्यावरून गाईची निवड दूध उत्पादनासाठी करावी. शक्यतो गाभण गाय विकत घेताना माहितीच्या पशुपालकाकडूनच खरेदी करावी जेणेकरून गाईच्या पूर्वजांची काही माहिती असल्यास समजेल. उदा. दूध उत्पादन, आरोग्याची माहिती इ.

* गाय घेताना कोणत्या जातीची घ्यायची, त्या जातीचे गुण पशुपालकाला माहिती असावे व ते ती स्पष्ट दर्शविणारी असावी. उदा. रंग, कासेचा आकार, शरीराचा आकार, एका वेताचे दूध उत्पादन इ.

* गाय मागील बाजूने पुढे पाहिल्यास पाचरीसारख्या आकाराची असावी म्हणजेच गायीची ठेवण त्रिकोणाकृती असावी. गाय जास्तीत जास्त रूंद असावी, मागच्या व पुढच्या पायांमध्ये भरपूर अंतर असावे. मागच्या पायात कासेच्या योग्य ठेवणीसाठी भरपूर अंतर असावे. मांड्या अंतर्वक्र असल्यास कासेची ठेवण योग्य राहते. गाय शरीराने मध्यम बांध्याची असावी.

* कमरेची हाडे रुंद असावी त्यामुळे गर्भाची वाढ व प्रसूति व्यवस्थित होते.

* शक्यतो कुठल्या रोगाची साथ असल्यास गाईंची खरेदी विक्री टाळावी तसेच निवडलेल्या गायीला कोणते आणि कधी लसीकरण केलेले आहे, याची माहिती घ्यावी.

* भरपूर मोठी कास असल्यावरच गाय जास्त दूध देते असे नाही. कास ही मोठी असावी परंतु लोंबकळणारी नसावी. कास जास्तीत जास्त शरीरास चिकटलेली असावी. गाईच्या कासेकडून पोटाकडे जाणारी दुधाची शीर ही स्पष्ट मोठी, जाड, फुगीर व नागमोडी असावी. कासेवर जास्तीत जास्त लहान नागमोडी दुधाच्या शिरा असाव्यात.

* खालच्या बाजूने कास स्पष्ट चार भागात विभागलेली असावी व मागच्या बाजूला जास्त रुंद व समान दोन भागात विभागलेली असावी. गायीची कास मऊ असावी व दूध काढल्यावर संपूर्ण मोकळी होणारी असावी.

* सर्व सड मोकळे असावेत. सड प्रमाणापेक्षा लहान व मोठे नसावेत. चांगली व निरोगी कास हे जास्त दुधाचे निदर्शक असते.

* गायीला संपूर्ण चार सड असावेत. तीन सडी किंवा दोन सडांची गाय खरेदी करणे टाळावे. गायीचे चारही सड समान आकाराचे असावेत, सडांमध्ये भरपूर अंतर असावे. चारही सड व्यवस्थित पिळून बघावे. चारही सडातून समान दूध येत असल्याची खात्री करावी, दूध काढून झाल्यानंतर सड समान झाले पाहिजेत ते खाली किंवा वर नकोत.

* गाई १२ महिन्यांत विणाऱ्या असाव्यात. व्यालेली गाय घेताना दुग्धोत्पादनाची खात्री करण्यासाठी शक्य असल्यास गाईचे तीन वेळचे दूध काढून पहावे. यावरून आपली होणारी फसवणूक टाळता येते.

* दुधाळ गाईची निवड करताना तिचे बाह्यस्वरूप, दूध उत्पादन आणि प्रजननक्षमता विचारात घ्यावी. केवळ मोठ्या आकाराची कास याबाबतीत गृहीत धरू नये.

* गाईच्या काही विशिष्ट सवयी आहेत का याचीही माहिती घ्यावी व लवकर पान्हावणारी व कोणासही धार काढू देणारी गाय निवडावी. गायीला स्वतःचे दूध स्वतः पिणे, दोरी चघळणे, पान्हा चोरणे, धार काढताना लाथा मारणे, कापड, दगड आणि विटा चघळणे यांसारख्या वाईट सवयी नसाव्यात.

* शक्यतो शिंगे असणारी गाय नसावी कारण शिंगे असणारी गाय ही कळपातल्या इतर गाईंना इजा पोहोचवू शकते तसेच शिंगे नसणारी गाय ही हाताळणीस सोपी जाते.

* गाईचे वय विचारावे व खात्रीसाठी दातांची तपासणी करावी यावरून गाईचे अंदाजे वय काढता येते. धारेला (पिळण्यासाठी) हलकी असणारी गाय निवडावी.

* ज्यावेळी गाईच्या दूध उत्पादनाची, प्रजननक्षमतेची आणि वंशावळीची माहिती खात्रीशीरपणे उपलब्ध होईल, त्यावेळी या माहितीच्या आधारे निवड करावी. ■